सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

Government of Maharashtra
**Police Department**
Office of the Commissioner of Police,
Dr. D.N. Road, Mumbai-400001.

Tel. No.: 022-22620332
Email : pressroom.mum@mahapolice.gov.in

---

O.W.No.371 / 2021

Date :- 23 / 07 / 2021

# प्रेस नोट

महिला पोलीस हवालदार क्र. ९६१८४१/ श्रीमती रजनी गंगाराम जाबरे/ नेमणूक भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई यांनी कोविड १९ या जागतिक महामारीत व मुंबई मध्ये अतिवृष्टीदरम्यान पाण्यात अडकलेल्या महिलांना, नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहचवून मोलाची कामगिरी केलेली आहे. आजारी इसम व वृध्द व्यक्ती व गॅगरींग झालेल्या इसमांना रुग्णालयात नेण्यात मदत केली. जीवन मरणाच्या दारात अडकलेल्या वृध्द व्यक्तीस धाडसाने शिडीने घरात प्रवेश करुन प्राण वाचविले. बेघर मुलांना वह्या पुस्तके वाटप करुन शैक्षणिक मदत केली, कोरोना काळात गरीब व गरजू लोकांना जेवण व औषधे वाटप करुन मोलाची कामगिरी केलेली आहे.

महिला पोहक्र. ९६१८४१/श्रीमती रजनी गंगाराम जाबरे यांचे प्रशंसनीय काम पोलीस दलाची प्रतिमा उंचाविणारे असुन भविष्यात त्यांनी अशीच कामगिरी करावी म्हणुन त्यांनी केलेल्या प्रशंसनीय व उल्लेखनीय कामगिरीबद्दल दि. २२/०७/२०२१ रोजी ११:३० वा. मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस सह आयुक्त (का. व सु.), बृहन्मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयात विशेष पारितोषिक व प्रशस्तीपत्र देवून त्याचां गौरव केला आहे.

( चैतन्या एस. )
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई.

Scanned with CamScanner